# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक. :
०२०—२५६२१२२८
२५६२१२२९
ई—मेल: pldvp@unipune.ac.in

नियोजन व विकास विभाग,
गणेशखिंड, पुणे—४११००७.

संदर्भ : साफुपुवि/निवวि/224 दिनांक : 26 मार्च, २०२५

प्रति,
मा. विभाग प्रमुख,
सर्व शैक्षणिक विभाग,
प्रस्तुत विद्यापीठ

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२४—२०२५ मध्ये गुणवत्ता सुधार योजनेअंतर्गत 'कार्यानुभव संधी (Internship) व ऑन-द-जॉब-ट्रेनिंग' या उपक्रमाअतंर्गत अर्थसहाय्यासाठी ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव सादर करणेबाबत.**

महोदय/महोदया,

विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार शैक्षणिक वर्ष २०२४—२५ मध्ये विद्यापीठाच्या गुणवत्ता सुधार कार्यक्रमांतर्गत, NEP 2020 च्या प्रभावी अंमलबजावणीच्या दिशेने, संलग्नित महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांमध्ये कार्यानुभव संधी (Internship) व ऑन-द-जॉब-ट्रेनिंग संदर्भात जागरूकता व संवेदनशीलता निर्माण करण्यासाठी कार्यशाळा आयोजित करण्यासाठी अर्थसहाय्य देण्यात येणार आहे. या योजनेसाठी ऑनलाईन पध्दतीने प्रस्ताव मागविण्यात येत असून सदर प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याचा कालावधी **गुरूवार, दिनांक २७/०३/२०२५ ते शुक्रवार, दिनांक ११/०४/२०२५** असा राहणार आहे.

सदर प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याची लिंक खालीलप्रमाणे —

**www.unipune.ac.in—Home page—BOD online—Login—For University Department Login & Password—Planning and Development**

आपणास विनंती की, सदर उपक्रमाच्या अर्थसहाय्यासाठी ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या प्रस्तावाची छापील प्रत व त्यासोबत मार्गदर्शक तत्वांमध्ये नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ती सर्व कागदपत्रे जोडून **मंगळवार दि. १५/०४/२०२५** पर्यंत कार्यालयीन वेळेत नियोजन व विकास विभागामध्ये जमा करण्यात यावी. तसेच ऑनलाईन व्यतिरिक्त इतर पध्दतीने सादर केलेल्या प्रस्तावांचा अर्थसहाय्यासाठी विचार केला जाणार नाही. मार्गदर्शक तत्वांमध्ये वेळोवेळी करण्यात येणारे बदल सर्व शैक्षणिक विभागांना बंधनकारक राहतील. याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे.

आपली विश्वासू,

26/3/25

डॉ. वैशाली साकोरे
उपकुलसचिव
(अतिरिक्त कार्यभार)

सोबत : 'कार्यानुभव (Internship) व ऑन-द-जॉब-ट्रेनिंग संधी मेळावा' योजना व मार्गदर्शक तत्वे

कार्यानुभव (Internship) व ऑन-द-जॉब-ट्रेनिंग संधी मेळावा योजना :

१) NEP 2020 च्या प्रभावी अंमलबजावणीच्या दिशेने, विद्यापीठाच्या गुणवत्ता सुधार कार्यक्रमांतर्गत, संलग्नित महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांमध्ये कार्यानुभव (Internship ) व ऑन-द-जॉब-ट्रेनिंग संदर्भात जागरूकता व संवेदनशीलता निर्माण करण्यासाठी कार्यशाळा आयोजित करण्यासाठी प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. यामध्ये स्थानिक उद्योग प्रमुखांना आमंत्रित करण्यात यावे. सदरील कार्यशाळा उद्योगांची संघटना/एमआयडीसी अशा संस्थांच्या सहकार्याने घेण्यात यावी. उद्योगांचे प्रतिनिधी विद्यार्थ्यांशी संवाद साधण्याच्या दृष्टीने एका सभागृहामध्ये सदर मेळाव्याचे आयोजन करण्यात यावे. कार्यक्रमाची सुरूवात विद्यापीठ गीताने करण्यात यावी.

२) कार्यशाळेची उद्दिष्टे खालीलप्रमाणे :

१) इंटर्नशिप आणि ऑन–द–जॉब–ट्रेनिंग (OJT) अनुलंब संदर्भात जागरूकता निर्माण करणे.

२) रोजगारक्षमतेसाठी या इंटर्नशिप आणि ऑन–द–जॉब–ट्रेनिंग (OJT) ची गरज आणि महत्व स्पष्ट करणे.

३) स्थानिक उद्योग, एसएमई, सरकारी कार्यालये, एनजीओ इत्यादींशी कनेक्ट होणे.

३) योजनेसाठी विद्यापीठाकडून मिळणारे अनुदान :

या योजनेसाठी विद्यापीठाकडून देण्यात येणारे अनुदान खालीलप्रमाणे

| अ. क्र. | विषय | सहभागी उद्योजक/कंपन्यांची संख्या | विद्यापीठाकडून देण्यात येणारे अर्थसहाय्य |
|---|---|---|---|
| १ | इंटर्नशिप आणि ऑन–द–जॉब– ट्रेनिंग (OJT) | कमीत कमी २५ | रू.२०,०००/– |
| २ | | कमीत कमी ५० | रू.३०,०००/– |

४) किमान विद्यार्थ्यांची उपस्थिती संख्या : १०० विद्यार्थी

५) कार्यशाळेचे स्वरूप व कालावधी :

१) कार्यशाळेचे उद्‌घाटन – १०–१५ मिनिटे (सुरूवात विद्यापीठ गीताने)

२) ४५ मिनिटांचे प्रत्येकी दोन सत्रे

३) कार्यशाळा समारोप – १०–१५ मिनिटे

SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY PLANNING AND DEVELOPMENT PUNE-7

या योजने अंतर्गत देण्यात येणाऱ्या अर्थसहाय्यासाठी सामाईक नियमावली व कार्यनिर्देश मार्गदर्शिका :

१) सर्व खर्चाचे हिशेब वेळेत सादर केलेले असणे आवश्यक आहे.

२) गुणवत्ता सुधार योजनेसाठीचे अनुदानाबाबतचे निर्णय हे संबधित अर्थशिर्षात शिल्लक असलेल्या रकमेच्या अधिन राहून घेतले जातील.

३) कोणताही प्रस्ताव मंजूर/नामंजूर करण्याचे अधिकार विद्यापीठाकडे राखीव असतील.

४) ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या प्रस्तावाची प्रत छापून (Printout) त्यासोबत मार्गदर्शकतत्वांमध्ये नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ती सर्व कागदपत्रे जोडून विद्यापीठाच्या नियोजन व विकास विभागाकडे विहीत मुदतीत सादर करावी. विहीत मुदतीनंतर, अपूर्ण कागदपत्रे जोडलेले, मार्गदर्शक तत्वांनुसार नसलेले प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत.

सदर प्रस्ताव ऑनलाईन पध्दतीने सादर करण्याची लिंक खालीलप्रमाणे —

**www.unipune.ac.in—Home page—BOD online—Login— For University Department & Password—Planning and Development**

SAVITRIBAI PHULE PUNE UNIVERSITY
PLANNING AND DEVELOPMENT
PUNE-7